अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शनिवार, दि. ७ ऑक्टोबर २०२३ | वर्ष : २२ वे | अंक : ९ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

## पाकचा नेदरलँडवर ८१ धावांनी विजय




अहमदाबाद : पाकिस्तान क्रिकेट संघाने २०२३ च्या विश्वचषक मोहिमेची सुरुवात विजयाने केली आहे. पहिल्या सामन्यात पाकिस्तानने नेदरलँड्सचा ८१ धावांनी पराभव केला होता. या सामन्यात बाबर आझमच्या संघाने प्रथम फलंदाजी करत २८६ धावा केल्या, तर नेदरलँड संघाला २०५ धावांपर्यंतच मजल मारता आली आणि सामना ८१ धावांनी गमवावा लागला.

नाणेफेक गमावल्यानंतर फलंदाजी करताना संघाची सुरुवात चांगली झाली नाही आणि कर्णधार बाबर आझमसह आघाडीचे ३ फलंदाज स्वस्तात बाद झाले. मोहम्मद रिझवान आणि सौद शकील यांनी अर्धशतकी खेळी खेळून संघाला संकटातून बाहेर काढले. पाकिस्तानचा संपूर्ण संघ ४९ षटकांत २८६ धावा करून ऑलआऊट झाला.

या धावांचा पाठलाग करताना नेदरलँड्स संघाची सुरुवात देखील निराशाजनक राहिली. नेदरलँड्सचा संघ २०५ धावांवर गारद झाला. हॅरिस रौफने पॉल व्हॅन मीकरेनला क्लीन बोल्ड करून पाकिस्तानला विजय मिळवून दिला.

# मंत्र्यांच्या देखत कृषी विक्रेत्यांचा 'राडा'

# संताप पाहून मुंडेंनी अखेर 'धूम' ठोकली

## पंढरीच्या मेळाव्यात बोगस बियाणे कायद्याच्या विरोधात उडाला भडका

सुराज्य/पंढरपूर

**राज्याचे कृषी मंत्री धनंजय मुंडे यांना शुक्रवारी पंढरपुरात कृषी विक्रेत्यांच्या संतापाला सामोरे जावे लागले. राज्यभरातून आलेल्या कृषी विक्रेत्यांनी बोगस बियाणांच्या संदर्भात प्रस्तावित कायद्याला विरोध करण्यासाठी जोरदार घोषणाबाजी केली. मुंडे यांनी आपली बाजू लावून धरण्याचा प्रयत्न केला पण कृषी विक्रेते त्यांचे काहीही ऐकण्यास तयार नव्हते. बोगस बियाणांची जबाबदारी कृषी अधिकाऱ्यांची असताना आमच्यावर कारवाई कशासाठी? असा संतप्त सवाल कृषी विक्रेत्यांनी मुंडे यांना विचारला. या कारवाईतून विक्रेत्यांना वगळावे याबाबत ठाम राहत विक्रेत्यांनी जोरदार घोषणाबाजी सुरु ठेवली. विक्रेत्यांचा राडा सुरू केला तेव्हा आपले भाषण आटोपते घेत मुंडे यांनी मागच्या बाजूने धूम ठोकली.**



झाले असे की- मुंडे यांच्या उपस्थितीत पंढरपुरात राज्यस्तरीय कृषी मेळावा आयोजीत करण्यात आला होता. या मेळाव्याला राज्यभरातून २५ हजारापेक्षा जास्त खते बियाणे दुकानदार पंढरपूरमध्ये आले होते. त्यांचे भाषण सुरू असतानाच बियाणे-खत विक्रेत्यांनी बोगस बी बियाणे संदर्भात दुकानदारांवर गुन्हे दाखल होत असल्याचा मुद्दा उपस्थित केला.या कायद्याच्या विरोधात दुकानदार आक्रमक झाल्याचे पहायला मिळाले.

बोगस बियांमुळे शेतकऱ्यांच्या फसवणुकींचे प्रकार सातत्याने समोर येऊ लागल्याने राज्य सरकारने त्याच्या विरोधात कायदे बनवायला सुरुवात केली आहे. त्यातील काही जाचक अटींमुळे बोगस खते आणि बियाणांबाबत कंपन्या किंवा ते तपासणारे अधिकारी यांच्यावर कारवाई न करता थेट दुकानदारांवर झोपडपट्टी कायद्यानुसार कडक कारवाई करण्यात येणार असल्याने या मेळाव्यात हजारो दुकानदारांनी आपला संताप कृषिमंत्र्यांच्या समोर घोषणाबाजी करत व्यक्त केला.

कार्यक्रमाचा हॉल लहान होता. हजारोंच्या संख्येने विक्रेते बाहेरच्या बाजूला कृषिमंत्री काय बोलतात ते ऐकत उभे होते. मात्र या कायद्याबाबत कृषिमंत्र्यांच्या बोलण्याने विक्रेत्यांचे समाधान झाले नाही. या विक्रेत्यांनी सभागृहाबाहेर जोरदार घोषणाबाजीला सुरुवात केली. कृषी मंत्र्यांना वारंवार या बाहेरच्या घोषणाबाजीमुळे भाषणात अडथळे येत असूनही त्यांनी आपली भूमिका रेटून नेण्याचा प्रयत्न केला.

बोगस बियांमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होते. तुम्ही संपूर्ण कायदा तयार झाल्यावर मग बोला, यात भेसळ करणाऱ्या कंपन्या असो किंवा त्याला साथ देणारे कृषी अधिकारी असो त्या संर्वांवर कारवाई केली जाणार असल्याचे सांगितले. मात्र, विक्रेत्यांनी या मेळाव्यानंतर विक्रेत्यांनी कृषिमंत्री आणि राज्य सरकारवर संताप व्यक्त करत बाहेर जोरदार घोपषणाबाजी सुरु ठेवली. या कायद्यातून विक्रेत्यांना न वगळल्यास राज्यातील सर्व खते आणि बी बियाणे अर्थात निविष्ठा विक्री करणारे विक्रेते राज्यभर दुकाने बंद ठेवण्याच्या तयारीत असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले.

### असा आहे सवाल...

आम्हाला मिळणारी खते अथवा बियाणे हे कंपन्या बनवतात. ते योग्य का अयोग्य याची तपासणी राज्याचे कृषी अधिकारी करतात. यानंतर पॅकिंग केलेले साहित्य राज्यभर विक्रीसाठी दुकानात येत असताना बोगस बियाणे अथवा खते आढळल्यास कारवाई आमच्यावर का? असा सवाल हे हजारो दुकानदार करीत होते.

### काय आहे नेमके प्रकरण

महाराष्ट्र शासन कृषी निविष्ठा सुधारणा विधेयक २०२३ नुसार पाच विधेयके प्रस्थापित करत आहे. ज्याने भविष्यात कोणतीही पिढी हा व्यवसाय करु शकणार नसल्याची भूमिका विक्रेत्यांची आहे. या कायद्यात खालील भूमिका आहे.

● अप्रमाणित किंवा दुय्यम दर्जाचे बियाणे, कीटकनाशके, खते कोणताही विक्रेता तयार करत नाही ● सर्वजण कंपनीकडून सीलबंद पॅकिंग मध्ये येणाऱ्या निविष्ठा सीलबंद पॅकिंग मध्ये शेतकऱ्यांना विकतात ● अप्रमाणित, दुय्यम दर्जाच्या निविष्ठा विक्रीकरणाऱ्या विरोधात महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड कायदा १९८१ अमलात आणायचा शासनाचा प्रयत्न आहे. या कायद्यामध्ये हद्दपारीची, तडीपारीची तरतूदसल्याने विक्रेत्यांवर ती परिस्थिती येऊ शकते. ● राज्य शासनाने स्थानिक गुणनियंत्रकां प्रमाणे कृषी निविष्ठा केंद्रातपासणीचे अधिकार आता पोलिस प्रशासन व ग्रामसेवक याना दिले जाणार आहेत . त्यामुळे स्थानिक पातळीवरील गटातटाच्या राजकारणाचा गैरवापर केला जाऊ शकतो. ● पोलीस प्रशासनाला दिलेल्या अधिकारामुळे विक्रेत्यांच्यामागे पोलिसांचा ससेमिरा लागू शकतो. ● विक्री केंद्रात उपलब्ध असणाऱ्या निविष्ठांची एखादी सॅम्पल फेल गेल्यास त्या विक्रेत्यांवर थेट अजामीनपात्र गुन्हा दाखल होऊन ३ महिने ते १ वर्षे तुरुंगवासाची शिक्षा व दंड होऊ शकतो. ● सदरचे गुन्हे दाखल झालेस फक्त हायकोर्ट किंवा सुप्रीम कोर्टातच अपील करता येणार आहे.

## अजित पवार गटाला किंमत देऊ नका

### प्रदेश अध्यक्ष जयंत पाटील यांचे कार्यकर्त्यांना फर्मान




सुराज्य/सोलापूर

शरद पवारांना सोडून राज्यातील सत्तेत सहभागी होण्यासाठी गेलेल्या अजित पवार गटाला फारशी किंमत देऊन नका. त्यांचा विचार करून नका. शहर आणि जिल्ह्यातील अजित पवार गटात गेलेल्यांचे पक्षात कोणतेही योगदान नव्हते. त्यामुळे उलट त्यांच्या जाण्याने पक्षातील अडगळ दूर झाली आहे. पक्ष स्वच्छ झाला आहे, अशा शब्दात शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी अजित पवार गटाला फटकारे दिले.

सोलापूर जिल्हा राष्ट्रवादीची आढावा बैठक शुक्रवारी शांतीसांगर मंगल कार्यालयात तर शहर उत्तर विधानसभा मतदार संघातील चौंडेश्वरी मंगल कार्यालयात प्रदेश अध्यक्ष जयंत पाटील यांच्या उपस्थित मेळावा पार पडला. यावेळी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. दोन्ही मेळाव्याच्या व्यासपीठावर जिल्हाध्यक्ष बळीराम साठे, निरीक्षक शेखर माने, माजी महापौर महेश कोठे, विठ्ठल साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील,, शहराध्यक्ष भारत जाधव, मोहोळचे माजी नगराध्यक्ष रमेश बारसकर, अविनाश मार्तंड, महेश माने, माजी महापौर मनोहर सपाटे, जनार्दन कारमपुरी, बिज्जू प्रधाने उपस्थित होते.

पाटील पुढे म्हणाले, राज्यात ज्या घडामोडी होत आहेत, त्यामध्ये खा. शरद पवार यांच्यावर प्रेम करणारा वर्ग मोठा दिसून येत आहे. या घडामोडीत सर्व जिल्ह्यातील बहुतांश आमदार- खासदार शरद पवार यांच्या पाठीशी आहेत. सोलापूर जिल्ह्यातच थोडी वेगळी परिस्थिती आहे. शहरात फारसा फरक पडला नाही. जे गेले, त्यांना पक्षात काही स्थान नव्हते. उलट ते गेले त्यामुळे पक्षाची प्रतिमा स्वच्छ झाली आहे. त्यांना किंमत न देता नव्या उमेदीने कामाला लागा. आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकींकडे लक्ष देत बूथ यंत्रणा सक्षम करा, असा सल्ला देखील पाटील यांनी यावेळी दिला. राज्यातील जे आमदार पवारसाहेबांना सोडून गेले त्यांच्या मतदार संघात नवे पर्याय निर्माण केले आहेत. गेलेल्यांना एकदा निमंत्रण द्या आले नाही तर ठिक. पर्यायी उमेदवारांच्या कामाला लागण्याचा सल्ला पाटील यांनी यावेळी दिला.

### बा विठ्ठला त्यांना बुध्दी दे

राज्यामध्ये पक्ष चोरण्याची नवी प्रथा रूजू झाली आहे. आत पर्यंत भाजपने फूट पाडून दोन पक्ष चोरले आहे. त्यामुळी मी पंढरपुरातील विठ्ठलाला साकडे घालून आलो आहे. पक्ष चोरणाऱ्यांना चांगली बुध्दी दे. निवडणूक आयोगात काहीही होऊ दे,मात्र ज्या ठिकाणी शरद पवार उभे राहतील त्या ठिकाणी नवा पक्ष उभारी घेणार असल्याचे पाटील यांनी सांगितले.

## विवाहितेचा छळ करून रात्री घरातून दिले हाकलून

### पतीसह सासू-सासऱ्यावर गुन्हा



सुराज्य/सोलापूर

लग्नात मानपान केला नाही, फर्निचर दिले नाहीत. तसेच उर्वरित राहिलेल्या फर्निचरचे दोन लाख रुपये हे व्यवसायाकरिता आम्हाला द्यावती, असे म्हणत शारीरिक व मानसिक त्रास देऊन विवाहितेला रात्री घरातून हाकलून दिल्याची घटना उघडकीस आली आहे.

याप्रकरणी गीता बसव्या स्वामी (वय-३०,रा.६९,रा.जोडभावी पेठ) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. तिच्या फिर्यादीवरून पती बसव्या स्वामी, सासरे बकव्या स्वामी व सासू शांताबाई स्वामी यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना दि.८ एप्रिल २०२१ ते ८ मार्च २०२३ दरम्यान फिर्यादी यांच्या सासरी कलबुर्गी येथे घडली. तपास पोलीस हवालदार रुपनर हे करीत आहेत.

## उपायुक्त दर्जाच्या कर निर्धारण अधिकारीपदी लोकरे तर सहाय्यक आयुक्तपदी भोसले रुजू

सुराज्य/सोलापूर



महापालिकेत उपायुक्त दर्जा असलेले कर निर्धारण अधिकारीपदी आशिष लोकरे तर सहाय्यक आयुक्त पदी शशिकांत भोसले हे दोन अधिकारी महापालिकेत रुजू झाले आहेत. नगरविकास विभागाकडून उर्वरित रिक्त पदी अधिकारी पाठविण्याची प्रतीक्षा आहे.

सोलापूर महापालिकेतील सहाय्यक आयुक्त इतर पदे रिक्त असल्याने यासाठी शासनाकडे महापालिका प्रशासनाकडून सतत पाठपुरावा सुरू आहे. दरम्यान, शासनाच्या नगरविकास विभागाने महापालिकेच्या आकृतीबंधानुसार रिक्त असलेल्या उपायुक्त दर्जाचे एक कर निर्धारण अधिकारी आणि एक सहाय्यक आयुक्त हे अधिकारी दिले असून हे दोघे रुजू होऊन प्रशासकिय कामाला लागले आहेत.

शासनाच्या नगर विकास विभागाने महापालिकेच्या उपायुक्त दर्जाच्या असलेल्या दोन पैकि एक कर निर्धारण अधिकारी म्हणून आशिष लोकरे यांची नियुक्ती केली आहे. लोकरे हे सोलापूर जिल्हा प्रशासन अधिकारी म्हणून कार्यरत होते. त्यांची महापालिकेत बदली करण्यात आली आहे. त्यांनी महापालिकेच्या मालमत्ता कर विभागातील कामकाज देखील सुरू केले. शहर हद्दवाढ मधील सध्या सुरू असलेल्या मिळकतींच्या सर्व्हे बरोबरच मिळकत कराची जुनी आणि चालू आर्थिक वर्षातील वसुलीचे नियोजन हाती घेतले आहे. शासनाने औरंगाबाद विभागीय आयुक्त कार्यालयाअंतर्गत कार्यरत असलेले सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांची नियुक्ती केली आहे.

त्याचबरोबर महापालिकेच्या आस्थापनेवरील शासनाकडील सहाय्यक आयुक्त पदाच्या ३ जागा आणि महापालिका स्थानिक पातळीवरील २ सहाय्यक आयुक्त पदे व इतर पदे रिक्त आहेत.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



मला गरज नसतानाही त्यांनी रजा दिली!

कल्याण
690-52-255
मुंबई
480-26-259

## आयोगापुढे दावे-प्रतिदाव्यांची तोफ धडाडली



सुराज्य/विशेष प्रतिनिधी

### एकशीर एक टोले दिले...

सुनावणीत शरदराव यांनी एकशीर एक अजितदादा गटाला टोले दिले. शरदराव म्हणाले की, एक गट आम्हाला सोडून बाहेर पडला, पण मूळ पक्ष आमचाच. आमदार सोडून गेले असले तरी पक्षावरचा दावा आमचाच योग्य आहे. निर्णय होईपर्यंत चिन्ह गोठवू नका. सर्वाधिक अधिकार शरद पवारांकडे त्यामुळे अजित पवार पक्षावर दावा करु शकत नाही. राज्य आणि बाहेरही पक्ष कुणाचा? सर्वांना माहिती आहे. अजित पवार गटाने पक्षाची भूमिका पाळली नाही. एक गट बाहेर पडला, मूळ पक्ष आमच्याकडे आहे. २४ राज्यांच्या प्रदेशाध्यक्षांचा शरद पवारांना पाठिंबा आहे. पक्षाची स्थापना शरद पवारांनी केली. शरद पवार यांची अध्यक्षपदी निवड पक्ष घटनेला धरून आहे. त्यामुळे शरद पवार हेच राष्ट्रीय अध्यक्ष आहेत. शरद पवार यांनी घेतलेले निर्णय डावलता येत नाहीत. शरद पवारांचे नेतृत्व मान्य असे पत्र प्रदेशाध्यक्षांनी दिले आहे. असा युक्तीवाद शरद पवार गटाने निवडणूक आयोगाकडे केला आहे.

### अजितदादांचे प्रतिटोले...

ज्या ५५८ डेलिगेट्सच्या आधारे त्यांची निवड झाली ते सर्वच्या सर्व बेकायदेशीर आहेत. कारण राज्य नियुक्त्या घटनेप्रमाणे झालेल्या नाहीत. ५५ आमदार आणि २ खासदारांचा आम्हाला पाठिंबा आम्हाला आहे. महाराष्ट्र विधानसभेचे ५३ पैकी ४२, विधानपरिषदेचे ९ पैकी ६ आणि नागालँडमध्ये ७ पैकी ७ असे ५५ आमच्या पाठिशी, तर लोकसभेत ५ पैकी १ आणि राज्यसभेतील ४ पैकी १ खासदार आमच्यासोबत आहे. पक्षाच्या घटनेचे पालन व्यवस्थित होत नाही. केवळ एका पत्राद्वारे पक्षात नियुक्त्या कशा प्रकारे होऊ शकतात,असा सवाल अजितदादा गटाने उपस्थित केला. मुख्य प्रतोद आमच्या बाजूने, त्यामुळे ९ आमदारांवरील कारवाईचे पत्र बेकायदेशीर ठरते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा राष्ट्रीय दर्जा गेला आहे. त्यामुळे आमदारांची संख्याच आता महत्त्वाची आहे. त्याआधारेच पक्ष कोणाचा? हे ठरवता येईल, असा युक्तिवाद अजितदादा गटाने केला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या घड्याळ या चिन्हावरून काका आणि पुतण्या यांच्या गटात शुक्रवारी केंद्रीय निवडणूक आयोगासमोर सवाल-जबाबाची तोफ धडाडली. दोनही गटांनी एकमेकांवर जोरदार हरकती घेतल्या गेल्या.

राष्ट्रवादीचे घड्याळ हे चिन्ह गोठवले जाणार असल्याची शक्यता वर्तवण्यात आल्यानंतर शरदराव यांच्या गोटात एकच खळबळ माजली.ही वार्ता ऐकताच शरदरावांना धावाधाव करावी लागली. त्यानंतर त्यांनी हुशारी दाखवत आयोगापुढे एक युक्तीवाद केला. जोपर्यंत चिन्हावर निर्णय होत नाही, तोपर्यंत ते आम्हाला द्यावे, गोठवू नये अशी विंनती शरदरावांनी आयोगाकडे केली. दरम्यान अजितदादा गटाकडूनही प्रतियुक्तीवाद केला गेला. शरदराव हे मनमानीपणे पक्ष चालवत आहेत तसेच जयंत पाटील यांची नियुक्ती बेकायदेशीर असल्याचा दावा केला. सर्वाधिक आमदारांचा पाठिंबा आम्हाला आहे, त्यामुळे आम्हींच खरा पक्ष आहोत, असा सर्वात मोठा दावा अजितदादा गटाकडून करण्यात आला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि चिन्हाची लढाई निवडणूक आयोगात सुरू असून दोन्ही बाजूंनी जोरदार युक्तीवाद करण्यात आला. या सुनावणीच्या वेळी स्वतः शरद पवारांनी उपस्थिती लावली. सुनावणीवेळी शरद पवार यांच्याकडून अभिषेक मनू सिंघवी तर अजित पवार गटाकडून नीरज किशन कौल आणि मनिंदर सिंह यांनी युक्तिवाद केला. शुक्रवारी निर्णय होवू शकला नाही.पुढील सुनावणी सोमवारी ठेवण्यात आली आहे.

शरद पवारांची राष्ट्रीय अध्यक्षपदावर झालेली निवड ही बेकायदेशीर असल्याचा दावा अजित पवार गटाने केला आहे.

शरद पवारांच्या अध्यक्षपदाला मान्यता दिलेल्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्याही बेकायदेशीर असल्याचं अजित पवार गटाने सांगितले. शरद पवार हे आपल्या मर्जीप्रमाणे पक्षाचा कारभार करतात असा आरोपही अजित पवार गटाने केला आहे.